पुणे महानगरपालिका
जाहिर प्रकटन

विधी विभाग, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ०५.

पुणे शहरातील पुणे मनपा कोर्ट, पुणे जिल्हा न्यायालय, ग्राहक मंच व हरित लवाद, तसेच धर्मादाय आयुक्त न्यायालय, जिल्हा भूमी सेवा प्राधिकरण महसूल खात्याकडील व इतर प्राधिकारी यांचेकडील पुणे महानगरपालिका पक्षकार असलेल्या दाव्यांमध्ये पुणे महानगरपालिकेचे वतीने कामकाज करणेकरिता वकिलांची धोरणानुसार शर्ती अटींवर नेमणूक करावयाची असून त्याकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणा-या वकिलांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र वकिलांनी आपले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मा.महापालिका आयुक्त यांचे नावे संकेतस्थळावरील अटी व शर्तीनुसार दि.१३/११/२०२६ पासून ते दि. २०/११/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत विधी विभाग खोली क्र.२२८ येथे सादर करावेत.
पात्रता धारण करीत नसलेले, विहित कालावधीत दाखल न केलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

पदाचे नाव	**शैक्षणिक अर्हता**	**व्यावसायिक** **फी रुपये**	**अनुभव/ प्रॅक्टिस**	**अनुभव पात्रतेकरिता कागदपत्रे**
पुणे महानगरपालिकेच्या पॅनेलवरील वकील	मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी	महानगरपालिकेच्या मान्य धोरणानुसार देय फी	किमान १५ वर्षे मे.न्यायालयात प्रत्यक्ष प्रॅक्टीसचा अनुभव **किंवा** कन्व्हेन्सिंग व कायदेशीर सल्लागार म्हणून शासकीय / निम शासकीय आस्थापनाकडे / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील कामकाज करण्याचा १५ वर्षाचा अनुभव.	किमान १० वर्षातील प्रत्येक वर्षाकरिता वकिलांचे नाव नमूद असलेले किमान एक आदेशाची प्रत.अथवा न्यायालयाचे संकेत स्थळावरील वकिलांचे नाव समाविष्ट असलेली माहिती. **किंवा** कन्व्हेन्सिंग व कायदेशीर सल्लागार करिता शासकीय आस्थापनांना दिलेल्या वार्षिक किमान १ अभिप्रायाच्या प्रती

याबाबतच्या अटी व शर्ती तसेच अर्ज, स्वयंघोषणापत्र इत्यादीचा मसुदा **https://www.pmc.gov.in/l/recruitment या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.**

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या अटी व शर्ती सह मसुदा

पुणे महानगरपालिका

विधी विभाग, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ०५.

पुणे शहरातील पुणे मनपा कोर्ट, पुणे जिल्हा न्यायालय, ग्राहक मंच व हरित लवाद, तसेच धर्मादाय आयुक्त न्यायालय, जिल्हा भूमी सेवा प्राधिकरण महसूल खात्याकडील व इतर प्राधिकारी यांचेकडील पुणे महानगरपालिका पक्षकार असलेल्या दाव्यांमध्ये पुणे महानगरपालिकेचे वतीने कामकाज करणेकरिता वकिलांची धोरणानुसार शर्ती अटींवर नेमणूक करावयाची असून त्याकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणा-या वकिलांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र वकिलांनी आपले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मा.महापालिका आयुक्त यांचे नावे दि. २०/११/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. पात्रता धारण करीत नसलेले, विहित कालावधीत दाखल न केलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

पदाचे नाव	**शैक्षणिक अर्हता**	**व्यावसायिक** **फी रुपये**	**अनुभव/ प्रॅक्टिस**	**अनुभव पात्रतेकरिता कागदपत्रे**
पुणे महानगरपालिकेच्या पॅनेलवरील वकील	मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी	महानगरपालिकेच्या मान्य धोरणानुसार देय फी	किमान १५ वर्षे मे.न्यायालयात प्रत्यक्ष प्रॅक्टीसचा अनुभव **किंवा** कन्व्हेन्सिंग व कायदेशीर सल्लागार म्हणून शासकीय / निम शासकीय आस्थापनाकडे / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील कामकाज करण्याचा १५ वर्षाचा अनुभव.	किमान १० वर्षातील प्रत्येक वर्षाकरिता वकिलांचे नाव नमूद असलेले किमान एक आदेशाची प्रत.अथवा न्यायालयाचे संकेत स्थळावरील वकिलांचे नाव समाविष्ट असलेली माहिती. **किंवा** कन्व्हेन्सिंग व कायदेशीर सल्लागार करिता शासकीय आस्थापनांना दिलेल्या वार्षिक किमान १ अभिप्रायाच्या प्रती.

अटी व शर्ती :-

१. उमेदवाराची वर नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक.

२. सदरची नेमणूक अस्थायी स्वरूपाची तसेच पॅनेल स्वरुपाची असल्याने ३ वर्ष कालावधी करिता आहे. या पदावर कायमस्वरूपी नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

३. उमेदवाराने अर्जासोबत दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, बार कौन्सिलचे ओळखपत्र, पदवी गुणपत्रिका, विधी शाखेचे पदवी प्रमाणपत्र, सनद, अनुभवाबाबतची प्रमाणपत्रे, इ. कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती **तीन संचात** सादर करणे आवश्यक आहे.

४. उमेदवाराने सादर करावयाच्या विहित नमुन्यातील अर्ज- **https://www.pmc.gov.in/I/recruitment** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्जाची प्रिंट काढून आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे

५. उमेदवारास नेमणूक देण्याबाबत सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

६. निवड झालेल्या वकिलांना मुख्य विधी अधिकारी, विधी विभाग पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयात दररोज किमान २ तास उपस्थित राहून रोजचे रोज त्यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज करावयाचे आहे.

७. मुलाखतीस येणा-या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

८. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९. पुणे महानगरपालिकेचे विरुद्ध कोर्ट केसेस किंवा कायदेविषयक कामे वरील नेमणुकीच्या कार्यकाळात स्वीकारता येणार नाहीत.

१०. सदर पॅनेल ॲडव्होकेट नेमणूक प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे, रद्द करण्याचे व प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहतील.

११. पात्र उमेदवारांची संख्या नियंत्रित करण्यासाठी अर्जदारांची छाननी करणे अथवा लेखी परीक्षा किंवा मुलाखत घेणे या संदर्भातील अंतिम निर्णय मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

१२. पात्रता धारण करीत नसलेले, विहित कालावधीत दाखल न केलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

वरील पदाकरिता शैक्षणिक पात्रता असलेल्या व अनुभवधारक वकिलांनी दि.१३/११/२०२६ ते दि.२०/११/२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेमध्ये आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित विधी विभाग खोली क्र.२२८ दुसरा मजला, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे-४११००५ येथे सादर करावेत. वरील मुदत संपल्यानंतर सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

ठिकाण: पुणे
दिनांक :
जाहिरात क्र.-

पुणे महानगरपालिका

३ वर्षे ॲडव्होकेट पॅनेल नेमणूक बाबत

PHOTO

सदर फॉर्ममधील सर्व तपशील भरणे अनिवार्य असून, अपूर्ण फॉर्म बाद ठरवण्यात येतील याची नोंद घ्यावी.

१. संपूर्ण नाव : (आडनाव) (प्रथम नाव) (मधले नाव)

श्री/ सौ / श्रीमती.....

२. पत्ता :- .....

.....

३. ई मेल आयडी :- भ्रमणध्वनी क्रमांक:-

४. राष्ट्रीयत्व : लिंग:-

५. सनद (नोंदणी क्रमांक) :-

६.जन्म दिनांक :-

दिनांक	महिना	सन

७. शैक्षणिक पात्रता :-

पदवीचे नाव	महाविद्यालयाचे नाव	वर्ष	एकूण गुण (%)

८. मातृभाषा व ज्ञानभाषा :-

९. वकिलीचा अनुभव :- ..... वर्ष..... महिने

१०. मे. न्यायालयात प्रत्यक्ष प्रॅक्टीस अथवा शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कन्व्हेंसिंग व कायदेशीर सल्लागार अनुभवाचा तपशील खाली भरावा.

कामाचे अनुभवाचे अनुषंगाने संस्थेचे / व्यक्तीचे नाव व पत्ता	कामाचा अनुभव कालावधी	कामाचे तपशील

११. मागील ज्या वर्षांचे न्यायालयीन आदेश या फॉर्म सोबत जोडले आहेत तिथे खूण [∨]करण्यात यावी

२०२६	२०२५	२०२४	२०२३	२०२२
२०२१	२०२०	२०१९	२०१८	२०१७
२०१६	२०१५	२०१४	२०१३	२०१२

१२.या फॉर्म सोबत जोडलेल्या कागदपात्रांची यादी

क्र.	कागदपत्र	क्र.	कागदपत्र
क्र.	कागदपत्र	क्र.	कागदपत्र

मी असे खात्रीपूर्वक विधान करतो / करतेकी, वर नमूद केलेली सर्व माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी असून सदर जागेसाठी संबंधित नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक: .....

अर्जदाराची स्वाक्षरी

प्रपत्र – अ

स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी, ----------

वय ----------वर्ष, आधार क्रमांक- ----------,

सनद क्र.---------- व्यवसाय ---------- राहणार----------

---------- याद्वारे घोषित करतो / करते की सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय न्याय संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:- अर्जदाराची सही ----------